फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ३४/२०१८
निशाणी क्र.३९.

जाबदेणारतर्फे सा.क्र.२
शपथेवर सुरु.

<u>उलटतपास अर्जदारतर्फे वकिल श्री बी के कडाळे यांचेमार्फत सुरुः–</u>

०१. माझे शिक्षण १० वी पर्यंत झाले आहे. जमीन गट क्र.३६८ सध्या माझ्या नावे नोंद आहे. सदर जमीन सन २००६ साली माझ्या नावे नोंद झाली. सदर जमीनीत मी जिरायती पिके घेतो. अर्जदारचे वय साधारणतः ५५ ते ६० वर्षे आहे. अर्जदारचे मणक्याची व गुडघ्याची शस्त्रक्रिया झाल्याचे मला माहित नाही. मी अर्जदारकडे तिच्या तब्येतीची चौकशी केलेली आहे. अर्जदारने मला शस्त्रक्रियेबाबत काहीही सांगितलेले नाही. मी अर्जदारला आजपर्यंत कधीही दवाखान्यात नेले नाही.

०२. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडिल निराभीमा सारख कारखान्याचे सभासद आहेत. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.३६८ ही मिळकत माझ्या नावे नोंद होण्यापूर्वी माझ्या वडिलांच्या नावे ऊस निराभिमा कारखान्यास बऱ्याचवेळा गेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सध्या रक्कम रु.१५००/– मध्ये एक महिन्याचा उदरनिर्वाह होवू शकत नाही.

०३. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१७ पासून सध्या धान्याचे, किरणा मालाचे, कपड्यांचे, औषधोपचारांचे दर वाढलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.३६८ ही जमीन पुर्वी माझ्या वडिलांच्या नावे होती. हे म्हणणे खरे नाही की, निर्वाहभत्याची रक्कम वाढू नये म्हणून माझ्या वडिलांनी सदर मिळकत माझ्या नावे नोंद केली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांचा विट भट्टीचा कारखाना आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांकडे ट्रॅक्टर आहे. हे म्हणणे खरे नाही की त्यामधून माझ्या वडिलांना चांगले उत्पन्न मिळते. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार कोणताही कामधंदा करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे अर्जदारची

उपासमार होत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदारला वाढीव पोटगीची रक्कम द्यावी लागू नये म्हणून मी खोटी साक्ष देत नाही. माझ्या वडिलांना त्वचा रोग झाल्याबाबत कागदपत्र मी दाखल केली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांकडे विटभट्टी नसल्याचे व ट्रॅक्टर नसल्याचे मी सरतपासात खोटे नमूद केले आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास– नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत.

समक्ष

BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT

Digitally signed by BARTAKKE PRADEEP CHANDRAKANT
Date: 2026.01.28 12:02:51 +0530

दिनांकः २७/०१/२०२६ (प्र.चं.बारटक्के)

ठिकाण – इंदापूर. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर.